# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**( विद्या विभाग )**

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली –४४२६०५ (विद्या) फोन नंबर ७१३२. २२३३२३


गोविग/विद्या/क्र/ ९४/२० दि. १२/०२/२०२०

**प्रति,**

**मा.प्राचार्य/विभाग प्रमुख,**
**सर्व संलग्नित/संचालित महाविद्यालय व शैक्षणिक विभाग**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**विषयः– शुल्क निश्चिती समितीकडे शुल्का बाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १०१(३) नुसार विद्यापीठाने शुल्क निश्चिती समिती गठीत केलेली आहे. सदर समितीची सभा संलग्नित महाविद्यालयातील प्राप्त प्रस्तावानुसार आयोजित करावयाची आहे. सत्र २०२०–२१ करिता विद्यापीठाने निश्चित करून दिलेल्या शुल्का व्यतिरिक्त वाढीव शुल्क आकारावयाचे असतील अशा संलग्नित कोणत्याही महाविद्यालयास, शुल्क निश्चिती समितीकडे प्रस्ताव सादर करता येईल. प्रस्ताव सादर करण्याकरिता विद्यापीठाने दि. ०२/०३/२०२० पर्यंतची मुदत दिलेली असून सदर मुदतीत आपण आपला प्रस्ताव सांक्षाकित दस्ताऐवजासह उपकुलसचिव, विद्या विभाग गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या ठिकाणी पाठवावा, हि विनंती.

**प्रस्तावासोबत सादर करावयाचे दस्ताऐवजः–**

१) संबंधित अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी शासनाने परवानगी दिल्याचे पत्र, विद्यापीठाने संलग्निकरण दिल्याबाबतचे पत्र, संबंधीत अभ्यासक्रमासाठी निर्धारित प्रवेश क्षमता.

२) संबंधीत अभ्यासक्रमासाठी नियुक्त करण्यात आलेल्या पूर्णकाळ मान्यताप्राप्त व CHB शिक्षकांची यादी व विद्यापीठाद्वारे मान्यता देण्यात आलेल्या पत्राची प्रत व त्यांना देण्यात येत असलेल्या वेतनासंबंधीचा मासीक व वार्षिक तपशील.

३) संबंधीत अभ्यासक्रमासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अंशदानात्मक मान्यताप्राप्त शिक्षकांची यादी तसेच त्यांना देण्यात येत असलेल्या मानधनासंबंधीचा मासीक व वार्षिक तपशिल.

४) संबंधीत महाविद्यालयात इतरही अभ्यासक्रम( अनुदानित/विना अनुदानित) सुरू असल्यास त्याबाबतची तपशिल आणि विभागात नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदनिहाय यादी व त्यांना देण्यात येत असलेल्या वेतनासंबंधी मासीक व वार्षिक तपशिल.

५) संबंधित महाविद्यालयात ज्या अभ्यासक्रमाच्या शुल्क निर्धारणासाठी प्रस्ताव पाठविलेले आहेत तेच अभ्यासक्रम सुरू असल्यास यासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदनिहाय यादी व त्याच्या मासिक व वार्षिक वेतनासंबंधीचा तपशिल.

६) आवर्ती व अनावर्ती खर्चासंबंधी मागील तीन वर्षाचे खर्च(Audited income and expenditure Statement) व उत्पन्नाचे अंकेक्षित प्रमाणपत्र उपस्थिती विवरण (Balancesheet)

७) सदर अभ्यासक्रमासाठी नियुक्त करण्यात आलेल्या मान्यताप्राप्त पूर्णकाळ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नावाचा समावेश असलेल्या प्रमाणित बिंदुनामावलीची झेरॉक्स प्रत.

८) शुल्क निर्धारण प्रस्तावात मागणी केलेल्या शिक्षण व इतर शुल्काबाबतचा सविस्तर स्पष्टीकरणासह **(Justification)** तपशिल.

(दिपक जुनघरे)
उपकुलसचिव(विद्या)
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**